# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** सुरक्षीत वाहतुकीच्या दृष्टीने नागपूर शहरातील हसनबाग चौक अंतर्गत
**{वाहतूक विभाग}** विकास कामाकरीता रु. ४५,५९,१०५/- (पंचेचाळीस लक्ष ऐकोनसाठ हजार एकशे पाच रुपये फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८२० (690) अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई – निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-

१. या कामास्तव रु. ३७,९९,४९२/- रक्कमेला मा. अधिक्षक अभियंता यांनी SE/PWD/T.S/५०८/२०२३-२४ दिनांक ०६/०२/२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.
२. सदर प्राकलन वर्ष (२०२२ – २०२३) म.न.पा. नागपूर यांचे CSR दरावर आधारीत आहे.
३. उपरोक्त प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्या नंतर रितसर निविदा मागवून काम करण्यात येईल.
४. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 747/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 13/02/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, वाहतूक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सुरक्षीत वाहतुकीच्या दृष्टीने नागपूर शहरातील हसनबाग चौक अंतर्गत विकास कामाकरीता रु. ४५,५९,१०५/- (पंचेचाळीस लक्ष ऐकोनसाठ हजार एकशे पाच रुपये फक्त) राशीचे प्राकलनास पद क्र. A२२५०१५३०८२० (690) अंतर्गत प्रावधान मुक्त करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई – निविदा बोलविण्याच्या प्रस्तावास मा.प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.